सूचना का अधिकार

# महाराष्ट्र शासन
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली
## Government Medical College, Miraj, Dist-Sangli

Pandharpur Road, Miraj-416410 (M.S.)

Tel:0233/2232090-99 Fax:2231959 E-mail:- deangmcmiraj@yahoo.co.in

जा.क्र./शावैममि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/मुलाखत/ ८८५२/२०२३ दिनांक:११.०९.२०२३

## थेट मुलाखत

**विषय:- व्ही.आर.डी.एल (VRDL) लॅबसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करारतत्वावर (१२० दिवसांकरिता) पदे भरणेबाबत...**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज अंतर्गत व्ही. आर. डी. एल. (Virus Research & Diagnostic Laboratory) या प्रयोगशाळेकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (१२० दिवसांकरिता) खाली दिलेल्या तक्त्यानुसार नेमणूक करावयाची असून यासाठी दि. २२.०८.२०२३ रोजी जाहिर केलेल्या खालील पदाच्या पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी खाली दिलेल्या पत्त्यावर स्वखर्चाने उपस्थित रहावे. भरावयाच्या पदाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | एकत्रित वेतनप्रतिमाह | वय |
|---|---|---|---|---|---|
| १ | रिसर्च सांयटिस्ट-१/ सायंटिस्ट - बी (मेडिकल) | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून एम.डी. मायक्रोबायॉलॉजी **अथवा**मान्यताप्राप्त विद्यापीठातूनएम.बी.बी.एस. आणि तीन वर्ष मायक्रोबायॉलॉजी/ व्हायरॉलॉजी अनुभवासह | रु. ५६,०००/- + HRA | कमाल ३५ वर्षे |
| २ | लॅबोरेटरी टेक्निशियन | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून बी.एस्सी. डी.एम.एल.टी प्रमाणपत्र अथवा बीपीएमटी अनुभवासह | रु. २०,०००/- प्रतिमहिना | कमाल ३० वर्षे |
| ३ | डाटा एंन्ट्री ऑपरेटर | ०१ | किमान पदवीधर, संगणक ज्ञान, टंकलेखन प्रमाणपत्र (मराठी-३० व इंग्रजी-४०), डाटा एन्ट्री कामाचा अनुभव | २०,०००/- | २८ वर्ष कमाल |
| * इ.मा.व./इ.डब्यु.एस. व एस.सी./एस.टी. उमेदवारांना अनुक्रमे ०३ व ०५ वर्षे वयामध्ये सवलत. | | | | | |

**मुलाखतीचे ठिकाण**: अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

**मुलाखतीचा दिनांक व वेळ** : दि. २०.०९.२०२३, (बुधवार) दुपारी ३.०० वाजता.

### अटी व शर्ती:

१. सदरची नियुक्ती हि पुर्णपणे कंत्राटी तत्वावर असलेने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना शासकीय कर्मचारी यांना मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

२. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

पुढील पानावर...

३. करार पद्धतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४. करार पद्धतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील.

५. करार पद्धतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व ज़बाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील. सदर पदे ही साथरोग नियंत्रण प्रकल्पांतर्गत असल्याने परिसरात उद्भवणा-यासाथरोगांच्या उद्रेकांच्या वेळी प्रसंगानुरुप उद्रेकाच्या ठिकाणी जाऊन कामकाज करावे लागेल.

६. करार पद्धतीतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

७. करार पद्धतीतीवरील नियुक्त उमेदवारांनी कामावर रुजू होण्यापूर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी रु.१०० च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र / करारपत्र नोटरी करुन कामावर रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे. तसेच पदाच्या नियुक्ती आदेश संदर्भीत घेऊन मा. न्यायालयांत कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत याचिका दाखल करणार नसल्याबाबत निवड झालेल्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र (१०० रु.बॉन्ड पेपरवर) लिहून घेण्यात येईल.

८. नियम व अटीच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

९. उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एमएस-सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र अपेक्षीत आहे, नसल्यास सदर प्रमाणपत्र नियक्तीपासुन सहा महिन्यांच्या आत संस्थेत सादर करावे लागेल.

१०. निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील यासाठी कोणतेही निवेदन/ तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

११. कोणतीही पूर्वसूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवले आहेत.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना.